CNRNOMHSO070001962019
१.किसन सोपान खारे वगैरे ५
विरुध्द लक्ष्मण संभाजी गायकवाड

निशाणी क्रमांक ०५ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी निशाणी १८ लगत म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे.

३. वादीच्या मते मौजे–करकंब, तालुका–पंढरपूर येथील गट क्रमांक ७१०/१, क्षेत्र ०.५२आर व ७१०/२, क्षेत्र ०.५१आर या दावा मिळकती असून सदर मिळकतीला लागून गट क्रमांक ७११ या समाईक गटात विहिर असून त्यामध्ये वादी, प्रतिवादींना पाणी घेण्याचा निम्म्या हिस्स्याने अधिकार आहे. दावा मिळकतीमधून कोणत्याही भागातून कधीही रस्ता अस्तीत्वात नसताना प्रतिवादींच्या मनात वैशम्य निर्माण झाल्याने प्रतिवादींनी तहसिलदार सो., पंढरपूर यांचे कोर्टात मामलेदार कोर्ट कलम ५ प्रमाणे दावा मिळकतीमधून पश्चिम–पुर्व व पुढे उत्तर–दक्षिण चालीचा गाडी रस्ता अस्तित्वात होता अशी खोटी विधाने करुन अर्ज दाखल केला व प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०७.०३.२०१९ रोजी तहसिलदार यांनी मंजुर केला. या आदेशाविरुध्द वादीने उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडे रि.अ. नं.६७/२०१९ दाखल केले असून ते प्रलंबित आहे. प्रतिवादींना गट क्रमांक ७०९ चे उत्तर बाजुने पुढे पश्चिम–पुर्व चालीच्या रस्त्याने पाणंद रस्त्याने पुढे जाऊन उत्तर–दक्षिण चालीचा करकंब–नेमतवाडी रस्त्यास जाऊन मिळणारा रस्ता अस्तित्वात होता व आहे व याच रस्त्याने प्रतिवादी पुर्वीपासून

ये–जा करत आहेत. परंतु, तहसिलदार यांच्यावर राजकीय दबाव तंत्र वापरुन प्रतिवादींनी चुकीचा आदेश मिळवून वादींच्या मिळकतीत रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न चालू केला आहे. सबब, वादींना प्रस्तुतचा अर्ज व दावा दाखल करणे भाग पडले आहे असे नमुद केले आहे.

४. प्रतिवादींच्या कथनानुसार, गट क्रमांक ७०९ ही जमीन प्रतिवादींच्या खरेदी मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची असून या जमीनीच्या पुर्वेस गट क्रमांक ७०८, पश्चिमेस ७०९, दक्षिणेस गट क्रमांक ७१०/१/२ व गट क्रमांक ७११, उत्तरेस गट क्रमांक ७०७ या चतुःसीमेतील जमीन ही प्रतिवादींच्या मालकी हक्काची आहे. या जमीनीत जाणे–येणेसाठी दक्षिण बाजूस गट क्रमांक ७१०/१ व ७१०/२ या जमीनीच्या पुर्व बाजुने व गट क्रमांक ७११ च्या पश्चिम बाजुने दक्षिणेकडे असणा–या नेमतवाडी–करकंब या रस्त्यास पुर्वापार असा वहिवाटीचा रस्ता होता व आहे. गट क्रमांक ७११ ही विहीरपड मिळकत असून ती वादी, प्रतिवादीच्या समाईक मालकीहक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. गट क्रमांक ७११ मधील जमीन ही दक्षिणेकडे असणा–या पुर्व–पश्चिम, नेमतवाडी–करकंब रस्त्यालगत आहे. गट क्रमांक ७११ व ७१०/२ या जमीनीमधून गट क्रमांक ७०९ या जमीनीत जाण्या–येण्याचा रस्ता आहे. याच रस्त्याने प्रतिवादी गट क्रमांक ७०९ ची जमीन खरेदी घेतल्यापासून वहिवाट करत असून वादी विनाकारण प्रतिवादीस हरकत अडथळा करत असल्याने प्रतिवादींनी, तहसिलदार यांच्याकडे तक्रारी अर्ज दाखल केला होता. तहसिलदार साहेबांनी पुर्ण चौकशीअंती समक्ष पाहणी करुन स्थळ पाहणी पंचनामा करुन दिनांक ०७.०३.२०१९ रोजी रस्त्यावरील अडथळा दुर करुन वाहतुकीसाठी रस्ता खुला करावा असा वादींविरुध्द आदेश पारित केला आहे. या आदेशाची अंमलबजावणी करुन घेण्याचे काम चालू असताना, वादींनी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडे रि.अर्ज

दाखल केला आहे, परंतु त्यांनी कोणताही स्थगीती आदेश दिला नाही. प्रतिवादींनी दावा मिळकतीतून नवीन रस्ता करण्याचा कधीही प्रयत्न केलेला नाही. प्रतिवादींच्या हक्कात मिळालेल्या आदेशान्वये कायदेशीर मार्गाने रस्त्यावरील अडथळा काढण्याचे काम चालू असल्याने या कायदेशीर प्रक्रियेस स्थगीती मागण्याचा वादीस कोणताही हक्क व अधिकार नाही. याशिवाय ही गोष्ट न्यायालयाच्या अधिकार कक्षेबाहेरील आहे. वादीस एकाच गोष्टीकरिता दोन न्यायालयात दाद मागता येणार नाही. प्रतिवादींना वादग्रस्त रस्त्याखेरीस दुसरा कोणताही रस्ता अथवा मार्ग नाही. प्रतिवादींचे समाईक मालकीहक्काचे विहिरीवर जाणे–येणे सुध्दा बंद झालेले आहे. प्रतिवादींविरुध्द ताकीदीचा हुकूम केल्यास तहसिलदार, पंढरपूर यांनी रस्ता खुला करुन देण्याचा पारित केलेला आदेश निष्क्रीय होणार आहे, त्यापुढील प्रक्रिया थांबणार आहे, त्यामुळे प्रतिवादींचे कधीही पैशाने भरुन न येणारे नुकसान होणार आहे. न्यायाचा समतोल हा प्रतिवादींचे बाजुने आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा अशी प्रतिवादींनी विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादी यांचे परस्परविरोधी कथनांचा विचार करुन उपस्थीत झालेल्या वादांचे निराकरण होण्यासाठी खालीलप्रमाणे मुद्दे काढण्यात येत आहेत व त्याखालील त्याची कारणमिमांसा नमुद करत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी केस सिध्द केली आहे काय ? | होय |
| २. | न्यायाचे समतोलत्व वादीच्या बाजुने आहे काय ? | होय |
| ३. | मनाई आदेश न दिल्यास वादीची अपरिमित हानी होणार आहे काय ? | होय |
| ४. | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता–

६. वादीतर्फे विद्वान वकील श्री.बी.व्ही.भादुले व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री.एस.एस.देशमुख यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षांतर्फे केलेला युक्तीवाद हा अनुषंगिक मुद्दयांवेळी विचारात घेण्यात येत आहे.

७. वादीतर्फे विद्वान वकीलांनी आपल्या युक्तीवादात दावा मिळकत ही वादींची प्रत्यक्ष मालकी कब्जेवहिटीची मिळकत असून, गट क्रमांक ७११ हा वादी–प्रतिवादींमधील समाईक गट असून त्यामध्ये असलेल्या विहीरीवर दोघांनाही निम्म्या हिस्स्याने पाणी घेण्याचा हक्क असल्याचे कथन केले आहे. या अनुषंगाने त्यांनी गट क्रमांक ७१०/१, गट क्रमांक ७१०/२ तसेच गट क्रमांक ७११ चा ७/१२ उतारा दाखल केला असून, सदर उता–यांचे अवलोकन करता, पहिले दोन्ही गट हे वादींच्या मालकी वहिवाटीचे दिसून येतात तर गट क्रमांक ७११ चे क्षेत्र ४ आर असून ते वादी, प्रतिवादींमध्ये समाईक असल्याचे निदर्शनास येते. दावा मिळकत ही वादींचे वडील सोपान मारुती खारे यांनी शंकर महादु माळी व इतर यांच्याकडून रक्कम रुपये २,०००/– च्या मोबदल्यापोटी दिनांक २०.१०.१९७३ रोजी अ.क्र.नं.६६५/१९७३ चे दस्तान्वये न्यायालयाच्या आदेशान्वये खरेदी घेतल्याचे दिसून येते. या कागदपत्रांवरुन दावा मिळकत ही वादींची खरेदी मालकीची मिळकत असल्याचे स्पष्ट होते. तसेच वादी त्यांचे पुर्वहक्कदारापासून दावा मिळकतीचा उपभोग घेत असल्याचेही दिसून येते.

८. वादीतर्फे विद्वान वकीलांनी आपल्या दीर्घ युक्तीवादामध्ये तहसिलदार, पंढरपूर यांनी प्रतिवादींच्या हक्कात रस्ता अस्तित्वात नसतानाही तो खुला करुन देण्याबाबतचा आदेश कसा बेकायदेशीर व वस्तुस्थीतीविरुध्द आहे याचे विवेचन केले. या

अनुषंगाने त्यांनी दिनांक ०७.०३.२०१९ रोजीचे तहसिलदार यांचेकडील निकालपत्र दाखल केले आहे. या निकालपत्रातील आदेशातील रस्ता मागणीबाबतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे या विधानासहित आक्षेप घेऊन ज्यावेळी प्रतिवादीतर्फे रस्ता खुला करुन मिळावा अशी मागणी करण्यात येते त्यावेळी त्यांचा रस्ता मागणीचा अर्ज मंजुर करण्यात येतो, या विधानावरुनच विसंगती दिसून येत असल्याचे कथन केले आहे. या अनुषंगाने त्यांनी मुख्यतः न्यायालयीन आयुक्तांच्या अहवालावर व नकाशावर भर दिला आहे. याउलट, प्रतिवादीतर्फे विद्वान वकीलांनी मुळात गट क्रमांक ७११ हा वादी, प्रतिवादीमध्ये समाईक गट असून त्यामध्ये विहीरीवर तसेच पुढे करकंब–नेमतवाडी या रस्त्यावर जाणेस गट क्रमांक ७१०/१ व ७१०/२ मधून रस्ता असल्याचे नमुद करुन या अनुषंगाने त्यांनी अ. नं. १५९७/२००६ या प्रतिवादी व संदीपान रामहरी बनकर यांच्यामध्ये झालेल्या खरेदी दस्ताचा आधार घेतला. सदर खरेदीदस्ताचे अवलोकन करता, त्या अन्वये संदीपान बनकर यांनी प्रतिवादींना गट क्रमांक ७०९ पैकी पुर्वेची ३९आर जमीन गट क्रमांक ७१०/१ मधील विहीरीतील पाणी १२ दिवसातून २ दिवस घेण्याच्या हक्कासह रक्कम रुपये १,००,०००/– च्या मोबदल्यापोटी खरेदी दिल्याचे दिसून येते. सदर खरेदीखतामध्ये सदर जमीनीच्या दक्षिण बांधाने जमीनीत व विहीरीत जाणेसाठी गाडी रस्ता ठेवण्याचा आहे असे नमुद केल्याचेही दिसून येते. या व्यतिरिक्त प्रतिवादीतर्फे वकीलांनी, तहसिलदार यांनी चौकशी दरम्यान केलेल्या स्थळ पाहणी पंचनाम्याचा आधार घेतला आहे. सदर पंचनाम्याचे अवलोकन करता, त्यामध्ये गट क्रमांक ७१०/१ व ७१०/२ मधून गट क्रमांक ७११ च्या पश्चिम बाजुने उत्तर–दक्षिण असा गाडी रस्ता दाखविल्याचे दिसून येते. तसेच सदर रस्त्यामध्ये ट्रॅक्टर उभे केल्याचे व बांधालगत पाचट पाला पाचोळा टाकल्याचे नमुद केल्याचेही दिसून येते.

९. न्यायालयीन आयुक्त यांनी स्थळ पाहणी केलेला अहवाल निशाणी ४१

लगत दाखल केला असून, त्यामध्ये गट क्रमांक ७११ मध्ये विहीरीच्या पश्चिमेस विहीरीलगत दक्षिणोत्तर पाईपलाईन असल्याचे तसेच पाण्याचा दंड असल्याचे नमुद केले आहे. तसेच विहीरीच्या पश्चिमेस ऊस, मका अशी पिके तुकाराम खारे यांच्या जमीनीत असल्याचे नमुद केले असून गट क्रमांक ७०८ च्या उत्तरेस ओढा असून, सदर ओढा हा करकंबकडून येत असल्याचे नमुद केले आहे. न्यायालयीन आयुक्त यांनी तपासणीच्या वेळी वस्तुस्थितीनुसार काढलेला नकाशा पाहता, त्यामध्ये गट क्रमांक ७१०/१ मध्ये गवार व ऊसाचे पिक असल्याचे तसेच त्याच्यालगत खाली दक्षिणेस गट क्रमांक ७१०/२ हा गट असून सदर दोन्ही गटाच्या पुर्वेस लगत गट क्रमांक ७११ हा असून त्यामध्ये समाईक विहीरीच्या उत्तरेस वादी क्रमांक १ यांचा गोठा तसेच विहीरीच्या दक्षिणेस वादींचे घराचे आंगण, विहीरीच्या पुर्वेस वादी क्रमांक १ यांची कॉक्रीटची वस्ती व त्यापुढे नारळाची झाडे असल्याचे दर्शविले आहे. एकूणच न्यायालयीन आयुक्त यांचा अहवाल पाहता, विहीरीच्या पश्चिम बांधावरुन दक्षिणोत्तर असा पाण्याचा दंड असून त्यालगत गाडी रस्ता असल्याचे अगर गाडी रस्त्याचे काही खाणाखुणाही असल्याचे नमुद केलेले नाही. याउलट, वादीच्या कथनाप्रमाणे, गट क्रमांक ७११ मधील वादी क्रमांक १ यांच्या वस्तीस लागून दक्षिणोत्तर ओढा असून या ओढयातून रस्ता असल्याचे व तो तसाच पुढे गट क्रमांक ७०८ ला वळसा घालून पश्चिमेकडे जात असल्याचे स्पष्ट होते. सदर रस्ता हा दक्षिणेस नेमतवाडी–करकंब या रस्त्यास मिळत असल्याचे स्पष्ट होते.

१०. प्रतिवादींच्या कथनानुसार, तहसिलदार यांनी रस्त्याबाबतचा आदेश पारित केला असताना, प्रतिवादीविरुध्द या न्यायालयास मनाई आदेश देण्याचा अधिकार नाही. या अनुषंगाने महसुल जमीन अधिनियम कलम १४३ पाहता उपकलम १ प्रमाणे तहसिलदार यांना बांधावरील रस्त्याबाबत चौकशी करुन त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. तसेच उपकलम ३ प्रमाणे सदर आदेशावर संबंधीत पक्षास अपिल अगर

पुनरीक्षण अर्ज दाखल करता येतो. या व्यतिरिक्त तहसिलदार यांच्या आदेशामुळे व्यथीत झालेल्या पक्षास उपकलम ४ प्रमाणे दावा दाखल करता येतो. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास अधिकार क्षेत्राची बाधा येत नसल्याचे स्पष्ट होते. जरी वादींनी सदर आदेश आव्हानीत केलेला नसला तरीही दिवाणी न्यायालयास निरंतर मनाई ताकीदीची दाद देण्याचे क्षेत्र नक्कीच आहे.

११. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, तहसिलदार यांनी दिनांक २७.०६.२०१७ रोजीचे स्थळ पाहणी पंचनाम्यात व न्यायालयीन आयुक्त यांनी दिनांक १२.०५.२०१९ रोजी केलेल्या तपासणी अहवालात रस्त्याबाबत विसंगती दिसून येते. वादीतर्फे दाखल केलेल्या दावा मिळकतीच्या फोटोग्राफसवरुन ओढयामधून मोठा कच्चा गाडी रस्ता जात असल्याचे निदर्शनास येते. याशिवाय वादींच्या वस्तीसमोरचे फोटोग्राफस पाहता, त्यामध्ये वादींच्या घरासमोर आंगण तसेच जनावरांचा गोठा व घरालगत शेत असून त्यामध्ये पिके असल्याचेही निदर्शनास येते. प्रतिवादी आपल्या शेतामध्ये नांगरट करत असल्याचेही वादींनी फोटोग्राफस दाखल केले असून, त्याद्वारे प्रतिवादींना आपले शेत वहिवाटण्यास कोणतीही अडचण नसल्याचे नमुद केले आहे. एकूणच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता, दावा मिळकत वादींची मालकी हक्काची व कब्जेवहिवाटीची मिळकत असल्याचे वादींनी सिध्द केले आहे. त्यामुळे वादींच्या पक्षात सकृतदर्शनी केस असल्याचे निदर्शनास येते. दावा मिळकतीत रस्त्याचे अस्तित्व दिसून येत नसतानाही जर प्रतिवादींनी नवीन रस्ता करण्याचा प्रयत्न केल्यास निश्चितच वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. प्रतिवादींच्या हानीचा विचार करता, प्रतिवादींना गट क्रमांक ७०९ च्या उत्तर बाजुने पश्चिम–पुर्व चालीचा रस्त्याने पुढे जाऊन उत्तर–दक्षिण जाणा–या रस्त्याने करकंब–नेमतवाडी या रस्त्यास जाता येते. तसेच सदर रस्ता गाडी रस्ता असून त्यांना त्याचा उपभोग घेता येतो. त्यामुळे

प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद दिल्यास प्रतिवादींची अपरिमित हानी होणार आहे असे दिसून येत नाही. सबब, वादग्रस्त रस्त्याबाबत गुण अवगुणावर निर्णय होईपर्यंत न्यायालयीन कामकाजाचे बाहुल्य टाळण्यासाठी प्रतिवादीविरुध्द सद्यस्थीतीत निरंतर मनाई ताकीदीचा आदेश पारित करणे योग्य वाटते. वादींनी सकृतदर्शनी केस सिध्द केल्याने न्यायाचा तराजूही आपोआप वादीच्या हक्कात झुकतो. सबब, मी मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता 'होकारार्थी' निष्कर्ष नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक ४ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी अगर तर्फे इसमाने तहसिलदार सो, पंढरपूर यांचेकडील रस्ता केस क्रमांक ०६/२०१८ मध्ये दिनांक ०७.०३.२०१९ रोजीच्या आदेशाच्या आधारे दावा मिळकतीमधून नव्याने रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करु नये तसेच दावा मिळकतीमध्ये वादींच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा होईल असे कृत्य करु नये अशी त्यांना दाव्याच्या अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई ताकीद देण्यात येत आहे.

सही/-

१६ सप्टेंबर, २०१९. (शि.शि.खरोशे)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| a) Name of the Stenographer | : | Sadafule M. P. Steno(LG) |
| b) Court | : | 3rd Jt.CJJD., Pandharpur. |
| c) Order signed by P.O. on | : | 16th September, 2019. |
| d) Order uploaded on | : | 17th September, 2019. |